# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:13.06.2026** **वार:शनिवार**

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात, देशात अनेक क्रांतिकारी बदल झाल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन
2. आगामी पावसाळी अधिवेशनात 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक 2026' सादर करणार
3. राज्यातील सर्व ग्रामीण पाणीपुरवठा योजना सौर ऊर्जेवर आणण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा
4. नीट फेरपरीक्षेसाठी विद्यार्थ्यांना अतिरिक्त 15 मिनिटांचा वेळ मिळणार आणि
5. नेमबाज आणि प्रशिक्षक जसपाल राणा यांचं निधन

**मोदी-मुख्यमंत्री**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या 12 वर्षांच्या पंतप्रधान पदाच्या कारकिर्दीत अनेक महत्त्वपूर्ण योजना राबवून देशाचा चेहरामोहरा बदलला, एवढच नाही तर या काळात जागतिक पातळीवर भारताची पत वाढविण्याचं कामही पंतप्रधानांनी केलं असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. पंतप्रधान मोदी यांनी सलग 4 हजार 399 पेक्षा अधिक दिवस देशाचं नेतृत्व करत सर्वाधिक काळ कार्यरत राहिलेले निर्वाचित पंतप्रधान म्हणून नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईत काल घेतलेल्या पत्रकार परिषदेत फडणवीस बोलत होते. यावेळी त्यांनी गेल्या 12 वर्षात केंद्र सरकारनं केलेल्या विविध क्रांतिकारक बदलांचा लेखाजोखा मांडला. महिला सक्षमीकरणासाठीच्या विविध योजना, पायाभूत सुविधा क्षेत्रात झालेले गुणात्मक आणि संख्यात्मक बदल, यासह केंद्र सरकारने घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयांची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. केंद्र सरकारच्या मदतीने महाराष्ट्रामध्ये झालेल्या विविध प्रकल्पांबाबत बोलताना मुख्यमंत्री म्हणाले.......

**केंद्र सरकारच्या मदतीने महाराष्ट्रामध्ये गेल्या दहा वर्षात शंभर पेक्षा अधिक प्रकल्प आपण पूर्ण केलेले आहेत. आज छत्रपती शिवरायांचे अकरा किल्ले युनेस्कोच्या वर्ल्ड हेरिटेज यादीत गेले आहेत. मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्यात आलेला आहे. भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचं स्मारक लंडनमध्ये असेल किंवा युनेस्कोत त्यांच्या पुतळ्याचं अनावरण असेल, इंदू मिल इथलं स्मारक असेल मुंबईचं आंतरराष्ट्रीय विमानतळ असेल, मेट्रो तीन सहित वेगवेगळ्या शहरांमधल्या मेट्रो असतील अटल सेतू कोस्टल रोड मुंबईपुणे कनेक्टिंग लिंक आणि सगळ्यात महत्त्वाचं पुढचे तीस वर्ष महाराष्ट्र देशात नंबर वन राहील अशा पद्धतीचं वाढवण बंदर की जे जगातलं पहिल्या दहा बंदरातलं बंदर असणार आहे. दहा लाख लोकांना रोजगार देणार आहे आणि महाराष्ट्राची आणि भारताची अर्थव्यवस्था बदलवून टाकणार आहे.**

**महिला सक्षमीकरण**

राज्यातील महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर मान्यता देण्यासाठी 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक 2026' आगामी पावसाळी अधिवेशनात सादर करणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मुंबईत काल एका बैठकीत या विधेयकाच्या मसुद्यावर सविस्तर चर्चा झाली. कृषी क्षेत्रातील महिलांना 'शेतकरी' म्हणून वैधानिक मान्यता देणे, त्यांच्यासाठी स्वतंत्र संस्थात्मक यंत्रणा उभारणे तसेच कर्ज, अनुदान, तंत्रज्ञान, बाजारपेठ आणि सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ उपलब्ध करून देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. या विधेयकात पारंपरिक शेतीबरोबरच शेतीपूरक क्षेत्रांत कार्यरत महिलांचा समावेश करण्यात येणार आहे. तसेच भूमिहीन, भाडेकरू आणि स्थलांतरित

कृषी कामगार महिलांनाही लाभ मिळणार आहे. हे विधेयक राज्यातील लाखो महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र ओळख, हक्क आणि संधी उपलब्ध करून देणारे महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

**सौरऊर्जा**

राज्यातील सर्व ग्रामीण पाणीपुरवठा योजना सौर ऊर्जेवर आणण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले आहेत. ग्रामीण पेयजल धोरणासंदर्भात काल मुंबईत झालेल्या बैठकीत ते बोलत होते. पाणीपुरवठा योजनेचा स्रोत, योजनेवर अवलंबून असलेल्या नागरिकांची संख्या, मोटार पंपाची क्षमता, योजनेसाठी लागणारी वीज या सर्व बाबींचा विचार करून, महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून संपूर्ण योजनांसाठी सौर ऊर्जेचं धोरण तयार करावं असं मुख्यमंत्री म्हणाले. राज्यामध्ये कुठेही वीज देयकांच्या थकबाकीमुळे पाणीपुरवठा योजना बंद पडू नये, याची काळजी घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

**अलनिनो**

दरम्यान अल निनोचा मोठा परिणाम आपल्या राज्यावर होण्याचा अंदाज असून यासाठी कृती दलाची स्थापना केल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. प्रत्येक जिल्ह्याला उद्दिष्ट देऊन जलसंधारणाची कामे पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत; राज्य सरकारकडून दिल्या जाणाऱ्या मार्गदर्शनानुसार शेतकऱ्यांनी पेरणी केली, तर दुबार पेरणीची वेळ येणार नाही असंही  फडणवीस म्हणाले.

**आषाढी वारी**

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आगामी आषाढी पालखी सोहळ्याच्या नियोजनाबाबत काल पुण्यात बैठक घेतली. संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज याबरोबर राज्यातील इतर संताचा पालखी सोहळा पुणे विभागात मुक्कामी असतो, या काळात वारकऱ्यांना सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावं असे निर्देश सुनेत्रा पवार यांनी दिले. वारकऱ्यांसाठी स्वच्छ शौचालये, पिण्याचे शुद्ध पाणी, आरोग्य सुविधा, मदत केंद्रे आणि दिशादर्शक फलक यांची पुरेशी व्यवस्था करावी. निर्मल वारी अभियान प्रभावीपणे राबवावं, कचरा व्यवस्थापन आणि अन्नपदार्थांतील भेसळ रोखण्यावर भर द्यावा असे निर्देश पवार यांनी दिले. पुणे विभागातील वरिष्ठ अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

**नीटयुजी**

येत्या 21 जून रोजी होणाऱ्या नीट युजी फेरपरीक्षेचा कालावधी 15 मिनिटांनी वाढवण्यात आला आहे. ही परीक्षा पारदर्शक पद्धतीने, सुरक्षित वातावरणात व्हावी, गैरप्रकार होऊ नयेत याकरता राष्ट्रीय चाचणी संस्थेने माजी परीक्षार्थींकडून सूचना घेऊन विविध उपाययोजना केल्या आहेत. त्यानुसार आता परीक्षेचा कालावधी 195 मिनिटांचा केला आहे. हा पेपर आता दुपारी 2 ते संध्याकाळी सव्वा पाच या वेळेत होईल. विद्यार्थ्यांची हजेरी पत्रकावर सही करणं, ओळखपत्र आणि इतर दस्तऐवजांची छाननी करणं या कामांसाठीचा वेळ त्यात अंतर्भूत राहील. त्याचप्रमाणे कच्च्या कामासाठी प्रश्नपत्रिकेत वाढीव जागा दिली आहे.  विद्यार्थ्यांनी प्रवेश पत्र आणि माहिती पत्रकावरच्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्या असं आवाहन एनटीएने केलं आहे.

**एसटी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन, अर्थात एसटी महामंडळाच्या प्रवासी सेवांमध्ये अधिक पारदर्शकता, सुलभता आणि डिजिटल व्यवहारांना चालना देण्यासाठी येत्या 1 ऑगस्ट पासून महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिक प्रवाशांसाठी National Common Mobility Card हे स्मार्ट कार्ड बंधनकारक केलं जाणार आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी ही माहिती दिली. आजअखेर नोंदणी केलेल्या 51 लाख नागरिकांपैकी 25 लाख स्मार्ट कार्ड कार्यान्वित केले आहेत.

**कांदा**

कांद्याची खरेदी क्विंटलमागे 1 हजार 650 रुपये दराने करायचा निर्णय काल केंद्रीय ग्राहक व्यवहार आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाच्या बैठकीत घेण्यात आला. कांदा खरेदीचं प्रमाण वाढवण्याबाबत तसंच शेतकऱ्यांना अधिक लाभ देण्याच्या

उद्देशाने केंद्रीय ग्राहक व्यवहार आणि सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. बाजारपेठेच्या परिस्थितीनुसार अधिक कांदा खरेदी व्हावी या प्रकारे कांद्याचं मूल्य ठरवण्याच्या पद्धतीत सुधारणा केल्याचंही जोशी यांनी म्हटलं आहे.

**<u>ओपनडे</u>**

पुण्यातील केंद्रीय जल आणि विद्युत संशोधन केंद्र उद्या 110 वा स्थापना दिवस साजरा करीत आहे. या निमित्ताने उद्या सकाळी 10 ते 4 या वेळेत नागरिकांना या केंद्रला भेट देऊन इथल्या कामकाजाची माहिती जाणून घेता येणार आहे. खडकवासला इथल्या जल आणि विद्युत संशोधन केंद्राच्या आवारात देशातील लहान-मोठ्या धरणांचे अभ्यास नमुने, जल विद्युत प्रकल्पांचे आराखडे नागरिकांना पाहता येणार आहेत. पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात येणार असल्याचं केंद्राचे प्रभारी संचालक अनिल पुरोहित यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

**<u>कुंभमेळा-अहिल्यानगर</u>**

आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याला जागतिक आध्यात्मिक तसच सांस्कृतिक पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्याच्या दृष्टीने शिर्डी इथं काल पर्यटनविषयक तयारीचा आढावा घेण्यात आला. केंद्रीय पर्यटन मंत्रालयाचे सचिव भुवनेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली ही उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीत कुंभमेळ्याच्या अनुषंगाने पर्यटन पायाभूत सुविधा, भाविकांसाठी सुविधा, सांस्कृतिक उपक्रम, ब्रँडिंग आणि देश-परदेशात प्रसिद्धी यासंदर्भातील नियोजनावर सविस्तर चर्चा करण्यात आली. नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी तयारीच्या सद्यस्थितीचे सादरीकरण केले.

**<u>विश्वकोश ज्ञानवर्धन- चंद्रपूर</u>**

राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या विश्वकोश ज्ञानवर्धन स्पर्धेत चंद्रपूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी बाजी मारली आहे. ऑनलाईन पध्दतीने झालेल्या या स्पर्धेमध्ये चंद्रपूरच्या मूल तालुक्यातील फिस्कुटी इथल्या विश्वभारती विद्यालयाच्या ममता कोसारे आणि सौरव लेंगुरे या विद्यार्थ्यांनी संयुक्तपणे प्रथम क्रमांक पटकावला आहे. याच विद्यालयातील वैभव पोहोणकर या विद्यार्थ्याने दुसरा क्रमांक मिळवला आहे. जिल्हाधिकारी वसुमना पंत यांच्या हस्ते काल यशस्वी विद्यार्थ्यांना गौरवण्यात आलं.

**<u>जसपाल राणा-निधन</u>**

प्रसिद्ध नेमबाजी आणि प्रशिक्षक; आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेते जसपाल राणा यांचं गुरुवारी दिल्लीत निधन झालं. ते 49 वर्षांचे होते. जर्मनीत झालेल्या आयएसएसएफ नेमबाजी विश्वचषक स्पर्धेनंतर प्रकृती बिघडल्याने त्यांना उपचारासाठी दिल्लीतल्या एका रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं; उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. 2024 च्या ऑलिंपिक स्पर्धेत भारताची आघाडीची नेमबाज मनु भाकर हिला त्यांनी मार्गदर्शन केलं होतं. राणा यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी शोक व्यक्त केला आहे.

**<u>हवामान</u>**

भारतीय हवामान विभागानं  येत्या दोन दिवसांत नैऋत्य मोसमी पाऊस महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगण, आंध्र प्रदेश, पश्चिम बंगाल, ओडिशा, झारखंड, बिहार आणि छत्तीसगड राज्यांमध्ये पुढे सरकण्यासाठी अनुकूल परिस्थिती असल्याचं म्हटलं आहे. राज्यात उद्यापर्यंत मेघगर्जना आणि विजांसह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर मराठवाडा, विदर्भात आज उष्णतेच्या लाटेचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं,**

**नमस्कार.**